PUDHARI, Mumbai, 14.8.2023
Page No. 3, Size:(11.30)cms X (8.85)cms.

# बुलेट ट्रेनच्या विरार स्थानकाला महामार्गाची जोड

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनसाठी रेल्वे रूळ उभारणीच्या पायाभूत कामांसह राज्यातील स्थानकांनी आकार घेण्यास सुरुवात केली आहे. ही स्थानके स्मार्ट असणार आहेत. मुंबई महानगरातील बुलेट ट्रेनचे शेवटचे स्थानक विरार आहे. विरार स्थानक जमिनीपासून २०.७९० मीटर उंचीवर असणार असून स्थानकाला राष्ट्रीय महामार्गासह रेल्वे मार्ग आणि तीन राज्य मार्गांची जोडणी देण्यात येत आहे.

सत्तांतर झाल्यानंतर राज्यातील बुलेट ट्रेनच्या कामाने वेग घेतला आहे. बुलेट ट्रेनच्या ५०८ किमीच्या मार्गात एकूण १२ स्थानके आहेत. त्यापैकी बीकेसी, ठाणे, विरार आणि बोईसर ही चार स्थानके महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्रातून एकूण १५६ किमी मार्गावरुन बुलेट ट्रेन धावणार आहे.

**सुसाट रस्ते प्रवासाची जोड**

जुना मुंबई-दिल्ली आणि चेन्नई महामार्ग जोडून राष्ट्रीय महामार्ग ४८ तयार करण्यात आला. मुंबई, पुणे, बंगळुरू, जयपूर, अहमदाबाद, सुरत या शहरांमधून हा महामार्ग जातो. विरार बुलेट स्थानकापासून अवघ्या ६ किमी अंतरावर हा राष्ट्रीय महामार्ग आहे. याचबरोबर पेल्हार रोड, चंदनसार रोड, विरार-नालासोपारा रोड यांची जोड असल्याने बुलेट ट्रेनने उतरल्यावर वेगाने रस्ते प्रवास करणे शक्य आहे.

**वलई पाडा रस्त्याचा विस्तार**

विरार-नालासोपाऱ्याला जोडणाऱ्या वलई पाडा रस्त्याचा सात मीटर रुंदीपर्यंत विस्तार करण्यात येणार आहे. यामुळे विरार नालासोपारासह मुंबई-अहमदाबाद मार्गावर प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. सध्या हा रस्ता सुमारे साडेतीन मीटर रुंद आहे.




## तळमजल्यावरील सुविधा

- तिकीट विक्री केंद्र, वेटिंग रुम, वैद्यकीय कक्ष, नर्सरी, किरकोळ विक्री केंद्र

## पहिला मजला

- चार प्लॅटफॉर्म, अप-डाऊन प्रत्येकी दोन मार्ग,लिफ्ट, एक्सलेटर

## बुलेट स्थानकापासून अंतर

| | |
|---|---|
| विरार रेल्वे स्थानक | ८ किमी |
| पेल्हार रोड | १ किमी |
| विरार-नालासोपारा रोड | ४.५ किमी |
| चंदनसार रोड | ९.५ किमी |
| राष्ट्रीय महामार्ग | ६ किमी |

## विरार रेल्वे स्थानकातील सुविधा

स्थानकाच्या दोन्ही दिशेला राखीव पादचारी क्षेत्र, बससाठी स्वतंत्र प्रवेशद्वार, रिक्षा, तीनचाकी, दुचाकी वाहनांसाठी आणि चारचाकी वाहनांसाठी स्वतंत्र प्रवेशद्वार, रिक्षा, बस आणि दुचाकीसाठी स्वतंत्र वाहनतळ, व्यावसायिक विकासासाठी राखीव क्षेत्र

**Bullet Trains's Virar Station will be connected by Expressway**